# प्रेसनोट क्र.   दिनांक २८/०२/२०२४

# दिनांक ०३/०३/२०२४ रोजी लोकअदालत असल्याने पालघर जिल्ह्यातील अनपेड ई-चलान वाहनधारकांनी दि.०२/०३/२०२४ रोजीपर्यंत दंड भरणे बाबत.

याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, राज्यात महाराष्ट्र शासनाचा **"वन स्टेट वन ई-चलान"** माहे एप्रिल २०१९ पासून संपुर्ण पालघर जिल्हयात कार्यान्वित झालेला असुन वाहतुक नियंत्रण शाखेकडून नियमांचे उल्लंघन करणारे वाहनधारक चालकांवर ई-चलान प्रणालीव्दारे कारवाई करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यातील आजपावेतो दंड न भरलेले वाहनधारक यांचे अनपेड ई- चलानची संख्या जास्त प्रमाणात असुन सदरची अनपेड ई- चलानची रक्कम ही खुप मोठया प्रमाणात आहे. सदर ई-चलान प्रणालीद्वारे कारवाई करण्यात आलेल्या वाहनाधारकांना एसएमएस संदेशाद्वारे सदर चलनाची तडजोड रक्कम भरणेबाबत सुचना देण्यात येतात. परंतु बऱ्याच वाहनधारकाने अदयापपावेतो अनपेड ई-चलान तडजोड रकमेचा भरणा केलेला नाही. अशा अनपेड ई-चलान वाहन धारकांनी दिनांक ०३/०३/२०२४ रोजी लोकअदालत असल्याने खालील नमुद ठिकाणी अनपेड ई-चलान तडजोड रक्कमेचा भरणा करु शकतात. तडजोड रकमेचा भरणा केल्यास लोकअदालतमध्ये हजर राहण्याची आवश्यकता नाही.

१. **रोख रक्कम रोख स्वरुपात अथवा डेबीट कार्डद्वारे, क्रेडीट कार्डद्वारे पालघर पोलीस ठाणे स्टेशन चौकी शेजारी, जिल्हा वाहतुक शाखा चौकी, रेल्वे स्टेशन, पालघर (पश्चिम) ता. जि. पालघर येथे भरु शकता.**

२. **वाहतुक अंमलदार यांचेकडे खालील नमुद ठिकाणी ई-चलान डिवाईसद्वारे अनपेड रक्कम भरु शकता.**

- **पालघर विभाग :-(वाहतुक शाखा रेल्वे स्टेशन चौकी, चाररस्ता, पाचबत्ती,)**
- **बोईसर विभाग :- (बोईसर रेल्वे स्टेशन चौकी,मधुरनाका, ओसवाल नाका)**
- **कासा विभाग :- (चारोटी कोस्टल चौकी )**
- **तलासरी विभाग :- (तलासरी नाका चौकी,आर टी.ओ. चेक पोस्ट )**
- **वाडा विभाग :- (खंडेश्वरी नाका, कुडुस चौकी )**
- **डहाणु विभाग :- (सागर नाका,मल्याण नाका)**
- **सफाळा विभाग :- ( रेल्वे फाटक सफाळा (पुर्व)**
- **तसेच वाणगांव, घोलवड, जव्हार, विक्रमगड, मोखाडा, या विभागातील वाहतूक अमलदार यांचेकडे ई चलान डिवाईसद्वारे अनपेड रक्कम भरु शकता.**

तरी वरीलप्रकारे आपले वाहनावरील अनपेड ई-चलान तडजोड रक्कम ही दि.०३/०३/२०२४ रोजी होणाऱ्या लोकअदालत पुर्वी भरावी. आपले वाहनांवरील अनपेड ई-चलान तडजोड रक्कम भरलेनंतर त्याची रितसर पावती घ्यावी. तरी वाहतूक नियमांचे पालन करुन नागरीकांनी पोलीसांना सहकार्य करावे असे पालघर जिल्हा वाहतुक शाखेकडून आवाहन करण्यात येत आहे.